**Goa Staff Selection Commission**
6th Floor, 3rd Lift, SPACES Building, Patto Plaza, Panaji-Goa – 403001
Website: gssc.goa.gov.in

No.1/7/2022-GSSC/Email-Website Dated: 08/04/2024

# वारंवार विचारले जाणारे प्रश्न

1) पदांसाठी जाहिराती कधी जारी केल्या जातात?
उत्तरः नियुक्ती प्राधिकरणाकडून मिळालेल्या आवश्यकतेनुसार आणि आयोगाच्या निर्णयानुसार वेगवेगळ्या पदांसाठी जाहिरात जारी केली जाते.

2) मला पदांसाठी आवश्यक पात्रता कुठे मिळू शकेल?
उत्तरःआयोगाच्या संकेतस्थळावर प्रकाशित केलेल्या जाहिरातीत आवश्यक पात्रतेचा उल्लेख केला आहे.

3) मला वेगवेगळ्या पदांच्या परीक्षेसाठीचा अभ्यासक्रम कुठे मिळू शकेल?
उत्तरःसंकेतस्थळावर जाहिरातीसह प्रत्येक पदासाठी लागणारा अभ्यासक्रम प्रकाशित केला आहे आणि तो **“अभ्यासक्रम टॅब”** खाली उपलब्ध आहे.

4) आम्ही ऑफलाइन पद्धतीने पदासाठी अर्ज करू शकतो का?
उत्तरः नाही, जाहिरातीमध्ये प्रकाशित केलेल्या कालमर्यादेत आयोगाद्वारे केवळ ऑनलाइन अर्जांचा विचार केला जाईल.

5) इतर संस्थांच्या परीक्षांची आणि आयोगाच्या परीक्षांची तारीख एकच असल्यास आयोग ती तारीख बदलण्याची विनंती स्वीकारतो का?
उत्तरः इतर संस्थांच्या परीक्षांची आणि आयोगाच्या परीक्षांची तारीख एकच असल्यास आयोग ती तारीख बदलण्याची विनंती स्वीकारत नाही. तसेच आयोग कोणत्याही कारणासाठी परीक्षा केंद्र/किंवा परीक्षेत बदलींची विनंती स्वीकारत नाही.

6) विनंती/मेल/पत्र पाठवल्यास आयोग अर्जामध्ये बदल करू शकतो का?
उत्तरः नाही.

7) आयोगाने जाहिरात केलेल्या पदांचे अर्ज करण्यासाठी नोंदणी अनिवार्य आहे का?

उत्तरः हो, आयोगाकडे एकदाच नोंदणी करणे ही एक अनिवार्य पूर्व अट आहे. नोंदणी पूर्ण झाल्यावर, अर्जदार आयोगाने जाहिरात केलेल्या कोणत्याही पदासाठी ऑनलाइन अर्ज करू शकतात.

8) मी त्याच लॉगिनने पदासाठी दोन वेळा अर्ज करू शकतो का?

उत्तरः नाही.

9) अर्जदाराने प्रत्येक वेळी परीक्षेसाठी अर्ज करण्यापूर्वी नोंदणी करावी का?

उत्तरः नाही, जर अर्जदाराने पूर्वी नोंदणी केली आहे, तर तिने/त्याने आयोगाद्वारे आयोजित वेगवेगळ्या परीक्षांसाठी तेच 'वापरकर्ता नाव' आणि 'पासवर्ड' वापरले पाहीजे.

10) एक वेळ नोंदणीसाठी काय प्रक्रिया आहे?

उत्तरः एक वेळ नोंदणीसाठी, https://gssc.goa.gov.in/, इथे भेट द्या, 'नोकर भरती' टॅबवर क्लिक करा, अर्जदार निवडा आणि त्यानंतर 'येथे अर्ज करा' यावर क्लिक करा. माहिती तंत्रज्ञान, इलेक्ट्रोनिक्स आणि संप्रेषण खाते, गोवा सरकार यांच्याद्वारे विकसित केलेल्या https://cbes.goa.gov.in/landing या संकेतस्थळावर तुम्हाला पुनर्निर्देशित केले जाईल. त्यानंतर नोंदणी टॅब वर क्लिक करा.

11) ) पदासाठी अर्ज करताना मी माझा फोटो आणि सही अपलोड करू शकत नाही.

उत्तरः कृपया तुमची फाइल 1 एमबी पेक्षा कमी असल्याचे तपासा आणि ती फक्त jpeg किंवा jpg फॉर्मेटमध्येच असावी.

12) नवीन नोंदणीसाठी मला ईमेलवर ओटीपी प्राप्त झाला नाही.

उत्तरः ई-मेल ओटीपी साठी, तुमच्या ई-मेलमधला 'Spam' फॉल्डर तपासा. जर तुमच्या Spam फॉल्डरमध्येही ओटीपी प्राप्त झाला नसेल तर कदाचित तुम्ही चुकीची ईमेल आयडी प्रविष्ट केली असावी किंवा नेटवर्क समस्या असावी. जर ओटीपीची समस्या चालूच राहिली तर तुम्ही हेल्पलाइन संपर्क क्रमांक किंवा पुरविलेल्या ईमेल आयडी वर संपर्क करू शकता.

13) जर अर्जदार पासवर्ड विसरला तर तो परत कसा मिळवायचा?

उत्तरः फॉर्गोट पासवर्ड टॅबवर क्लिक करा, वापरकर्ता नाव आणि स्क्रिनवर दर्शविलेला कॅप्चा प्रविष्ट करून चालू वर क्लिक करा. तुमच्या नोंदणीकृत ई-मेल वर पासवर्ड पुन्हा रिसेट करण्यासाठी लिंक पाठविली जाईल.

14) वेगवेगळ्या पदांसाठी ऑनलाइन फॉर्म भरत असताना आलेल्या शंका सांगण्यासाठी आयोगाचा हेल्पलाइन क्रमांक आणि इमेल आयडी काय आहे?

उत्तरः संपर्क क्र. 8530499686 किंवा शंका goacbes-support@gov.in. यावर मेल करा.

15) आयोगाने जाहिरात केलेल्या कोणत्याही पदांसाठी कसा अर्ज करावा?

उत्तरः कृपया गोवा कर्मचारी निवड आयोगाच्या संकेतस्थळावर अपलोड केलेली वापरकर्ता नियमावली आणि अर्जदाराला दिलेल्या सूचना पहा.

16) अर्जासोबत किती शुल्क भरावे लागेल?

जाप:

| प्रवर्ग | शुल्क (रुपयांमध्ये) | |
|---|---|---|
| | सीसीएस सुधारित वेतन नियम 2016 चा स्तर 1 ते 3 | सीसीएस सुधारित वेतन नियम 2016 चा स्तर 4 आणि वरील |
| अराखीव (यूआर) | 200 | 400 |
| एससी, एसटी | 50 | 100 |
| ओबीसी | 100 | 200 |
| दिव्यांग (पीडब्ल्यूडी) | 50 | 100 |
| ईडब्ल्यूएस | 100 | 200 |

* एससी, एसटी, ओबीसी, दिव्यांग आणि ईडब्ल्यूएस साठी वरील शुल्क अर्जदारांना केवळ विशिष्ट वर्गासाठीच्या पदाची जाहिरात केली असेल तरच लागू होतात.

17) अर्जाचे पैसे कसे भरावे?

उत्तरः ऑनलाइन अर्ज फॉर्म भरल्यानंतर, शुल्क यूपीआय किंवा नेट बँकिंग किंवा क्रेडीट किंवा डेबिट कार्डद्वारे फक्त ऑनलाइन पद्धतीने भरावे.

18) मी ऑफलाइन पैसे भरू शकतो?

उत्तरः नाही.

19) ऑनलाइन पैसे भरल्यानंतर जर अर्जाची स्थिती अपूर्ण दर्शविते किंवा अर्ज डाउनलोड होत नसल्यास काय करावे?

उत्तरः या समस्येसाठी हेल्पलाइन क्रमांक 8530499686 किंवा goacbes-support@gov.in. या ईमेल आयडी वर संपर्क करावा.

20) अंतिम अर्ज सादर केल्यानंतर पदासाठीच्या अर्जातील कोणत्याही तपशीलात बदल करण्यास परवानगी आहे का?

उत्तरः नाही, एकदा का ऑनलाइन अर्ज सादर केला, त्यात सुधारणा करण्यास परवानगी नाही. अर्जदाराने नवीन नोंदणी करून अर्ज करावा.

21) अर्हता, वयोमर्यादा, अनुभव आणि इतर कोणत्याही कागदपत्रांसाठी पात्रता निकष निश्चित करण्यासाठी अंतिम तारीख काय आहे?

उत्तरःशैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा, अनुभव आणि इतर कोणत्याही कागदपत्रांसाठी पात्रता निकष निश्चित करण्यासाठी अंतिम तारीख अर्जाच्या शेवटच्या तारखेनुसार असेल.

22) विविध प्रवर्गातील अर्जदारांसाठी वयाची किती सवलत उपलब्ध आहे?

उत्तरःकृपया http://gssc.goa.gov.in/ (अनुच्छेद 5 वाचा) वर उपलब्ध असलेल्या अर्जदारांसाठी सूचना वाचा.

23) जीएसएससी ने घेतलेल्या परीक्षांमध्ये नकारात्मक गुणांकन आहे का?

उत्तरःजीएसएससी ने घेतलेल्या परीक्षांमध्ये नकारात्मक गुणांकन नाही.

24) जर त्याचा/तिचा फोन नंबर/ईमेल आयडी कार्यरत नाही तर फोन नंबर/ईमेल आयडी कसा बदलावा?

उत्तरः वापरकर्त्याचा बदलायचा संपर्क क्रमांक आणि ईमेल आयडी जीएसएससीच्या us.gssc@goa.gov.in. या ईमेल आयडी वर ईमेल करा.

25) जर मला लॉग इन समस्या असेल तर काय करावे?

उत्तरः हेल्पलाइन क्रमांक 8530499686 किंवा goacbes-support@gov.in. या ईमेल आयडी वर तुमच्या समस्येसाठी संपर्क करा.

26) सरकारी कर्मचाऱ्यांनी रोजगार नोंदणी क्रमांक भरणे आवश्यक आहे का?
उत्तरः होय, सेवेपूर्वीचा रोजगार नोंदणी क्रमांक सध्या फक्त प्रविष्ट केला जाऊ शकतो.

27) जर पैसे दोन वेळा भरले गेले तर मी काय करावे?
उत्तरःकृपया तुमची समस्या हेल्पलाइन क्रमांक/ईमेलआयडी वर संपर्क करून आणि/किंवा ईमेल मेल करा आणि त्याचा तपशील द्या.

28) अर्जदार म्हणून अर्ज करणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्याकडे वैध रहिवासी दाखला असणे आवश्यक आहे का?
उत्तरः होय, वैध रहिवासी दाखल्याची आवश्यकता आहे.

29) जाहिरात केलेल्या पदांसाठी आयोगाकडून परीक्षा कधी घेतली जाईल?
उत्तरः आयोगाने जाहिरात केलेल्या पदांसाठी परीक्षेची तारीख अर्जदारांना त्याच्या संकेतस्थळाद्वारे कळवली जाईल आणि मराठी, इंग्रजी आणि कोंकणी भाषेत स्थानिक दैनिकांवर सूचना प्रकाशित केली जाईल.